**<u>रे.दि.मु. कमांक 290/2012 मधील निशाणी कमांक 5 वरील आदेश</u>**

1. वादींनी सदरचा अर्ज हा प्रतिवादीविरूध्द दावा कलम 1 व 1 अ चे सरहददीवर रस्ता अस्तित्वात आणु नये व त्यांच्या कब्जेवहिवाटीस हरकत अडथळा करू नये म्हणुन तुर्तातुर्त ताकीद मिळणेसाठी दाखल केला आहे.

2. सदरचा अर्ज व म्हणणे वाचले. वादींच्या कथनानुसार प्रतिवादी हे वादी यांना कोणतीही नोटीस न देता व कायदेशीर मार्गाचा अवलंब न करता दावा मिळकतीशी हक्क संबंध नसताना प्रस्तावित रस्ता करण्यासाठी क्षेत्र बळकावण्याचा प्रयत्न करीत आहे. त्यामुळे, वादीने दावा मिळकतीस मुकावे लागणार आहे. त्यामुळे, वादी कमांक 1 चे शौचालय पाडले जाणार आहे व उकीरडयाचे अस्तित्व नष्ट केले जाणार आहे. दावा कलम 1 व 1 अ मधील मिळकतीवर वादींची मालकी व कब्जेवहिवाट आहे. त्यामुळे, सदरचा अर्ज मंजुर करून प्रतिवादी विरूध्द तुर्तातुर्त मनाई देण्यात यावी अशी विनंती केली आहे.

3. प्रतिवादीने निशाणी 24 वर म्हणणे दाखल केले आहे. त्यांनी वादीचे सर्व कथनांचा इन्कार केला आहे. प्रतिवादीचे कथनानुसार आवर्डे हे गाव सन 1865 साली वसले आहे. चालु गट कमांक 15 व 16 चा पुर्वीचा सर्व्हे कमांक 2 होता. सदर सर्व्हे कमांक 2 हा सन 1865 चा गावठाण नकाशा पाहता गावठाणाला लागुन आहे. सदर सर्व्हे कमांक 2 चे 1961 चे दरम्यान 1 ते 16 असे वसले पडले आहेत. त्यामध्ये, वसला कमांक 13 चे 1 ते 8 पोट वसले पडले आहेत. सदर गावठाण नकाशात सर्व्हे कमांक 5 हा पश्चिम बाजुला व सर्व्हे कमांक 76, 13, 131, 145 पुर्व बाजुला असुन सर्व्हे कमांक 76, 75, 71, 81 व 82 हे दक्षिणेस आहेत. कडवे कोंजवडे ते तारळे येणे जाण्यास गावठाणामधुन पुर्वीच गाव रस्ता अस्तित्वात आहे. तो सर्व्हे कमांक 2 चे पुर्व व पश्चिम बाजुकडुन नकाशात नमुद केले आहे. मुळ सर्व्हे कमांक 2 हा बनु कोम देशमुख, मंजुळा देशमुख हासु, व तिच्या बहिणी यांच्या मालकीची होती. त्यांनी दिनांक 10/05/1998 रोजी 1. श्रीपती, 2. गेनु बाळा, 3. भाऊ मारूती, 4. बाबाजी सखाराम, 5. बयाजी सखाराम, 6. दौलता सखाराम, व 7. जगन्नाथ महादु यांना नोंदणीकृत खरेदीपत्राने अनुकमांक 1 ते 3 यांना 1/4 व बाकींच्यामध्ये 3/4 हिस्सा खरेदी दिला.

4. त्यानंतर, एकत्रिकरणाचे काम झाले. त्यावेळी सर्व्हे कमांक 2/13/7 यांस

गट क्रमांक 15 व सर्व्हे क्रमांक 2/13/8 यांचा गट क्रमांक 16 असा पडला आहे. त्यामध्ये तुकाराम धुळा, गोविंदा दौलता खामकर, जगु महादा खामकर 8 आणे, व दौलता खामकर 4 आणे, गोविंद खामकर 4 आणे असे आणेवारीने हिस्से पडले आहेत. गट क्रमांक 16 मध्ये सामाईक आणेवारीने जगु खामकर यांच्या वारसाची नोंद असुन त्यांना या दाव्यात पक्षकार केलेले नाही.

5. दावा मिळकत ही सामाईक वहिवाटीची आहे. वादी हे संपुर्ण क्षेत्र स्वतःचा आहे असे चुकीचे नमुद करत आहेत. वादी क्रमांक 1 यास गट एकत्रिकरणानंतर गट क्रमांक 16 मध्ये मालकी हक्क व कब्जा मिळालेला नाही. वादी क्रमांक 1 चा गट क्रमांक 16 चे अभिलेखास चुकीची नोंद लागलेली आहे. वादी यांना त्यांचे क्षेत्र नेमके कोठे व किती आहे हे माहित नाही. त्यांनी ग्रामपंचायत मुळ रस्त्यावर अतिक्रमण करण्याच्या दृष्टीने दावा दाखल केला आहे. दावा मिळकतीचे वाटप झालेले नाही. त्यामुळे ठराविक क्षेत्रावर हक्क सांगता येणार नाही. गट क्रमांक 15 व 16 यांचा उल्लेख सातबारा उता–यास परडे असा असुन घरपड असा नाही. उत्तरेकडुन दक्षिणेस गावठाणामध्ये येण्याजाण्यास कडवे गावाकडुन मुळ सर्व्हे क्रमांक 82, 81, 75, 76 व 2 मध्ये येणारा पुर्वापार रस्ता नकाशात आहे. या रस्त्यामध्ये शासनाच्या धोरणानुसार बांध बांधणीसाठी दुरूस्ती होण्यासाठी ग्रामपंचायत आवर्डे व ग्रामस्थ यांनी ठराव करून अनुदानाची मागणी केली आहे. वादी हे अतिक्रमण करून घर बांधत असुन अमृता खैरमोडे यांनी वादी व इतर सह हिस्सेदारांविरूध्द रे. दी. मु. क्रमांक 37/2003 दाखल केला आहे. सार्वजनिक रस्ता पुर्वापार अस्तित्वात असुन त्याचा ग्रामस्थ विना हरकत उपभोग घेत आहेत. वादीने अतिक्रमण केले आहे. त्यामुळे अर्ज नामंजुर करावा अशी विनंती प्रतिवादीने केली आहे.

6. वरील सर्व बाबी वरून सदर अर्ज निकाली काढण्यासाठी खालील मुददे निघत असुन त्यावरील निष्कर्ष सकारण पुढीलप्रमाणे :–

| अ.क | मुददे | निष्कर्ष |
|---|---|---|
| 1 | वादींनी त्यांच्या हक्कात प्रथमदर्शनी प्रकरण असल्याचे शाबित केले आहे का ? | नकारार्थी |
| 2 | वादींनी त्यांच्या हक्कात सोईचा समतोल असल्याचे शाबित केले आहे का ? | नकारार्थी |

| | | |
|---|---|---|
| 3 | सदर अर्ज नामंजुर झाल्यास अपरिमित नुकसान होईल असे वादींनी शाबित केले आहे का ? | नकारार्थी |
| 4 | काय आदेश ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## –: कारणमिमांसा :–

7. वादीने सदरच्या अर्जाच्या पृष्टयर्थ निशाणी 3/1 व 2 वर अनुक्रमे गट क्रमांक 15 व 16 चे उतारे, निशाणी 3/3 व 3/4 वर ग्रामपंचायत मिळकत क्रमांक 274/1 व 274/2 चे नमुना क्रमांक 8 चे उतारे, निशाणी 3/5 वर आवर्डे ग्रामस्थ, तहसिलदार पाटण यांच्याकडे दिलेली अर्जाची प्रत, निशाणी 3/6 व 7 वर प्रतिवादी क्रमांक 2 ते 5 यांनी तहसिलदार पाटण यांच्याकडे केलेल्या अर्जावरून आलेल्या नोटीसच्या प्रती, निशाणी 11/1 वर वादी क्रमांक 1 यास तहसिलदार पाटण यांच्याकडुन आलेली नोटीस, निशाणी 27/1 वर तलाठी आवर्डे यांनी घेतलेला जबाब, निशाणी 27/2 वर रामचंद्र सिताराम खामकर व ग्रामस्थ यांनी तहसिलदार पाटण यांच्याकडे रस्ता मागणीसाठी केलेला अर्ज, निशाणी 27/3 व 4 वर ग्रामपंचायत आवर्डे व ग्रामस्थांमधील ठरावाच्या नक्कला व निशाणी 77/5 वर आवर्डे ग्रामस्थांच्या सहया असलेला कागद दाखल केलेला आहे. याउलट, प्रतिवादीने कोणतेही कागदपत्री पुरावा दाखल केला नाही.

8. वादीतर्फे विधीज्ञ श्री. एस.एस.शिंदे यांनी युक्तीवाद केला. प्रतिवादी व त्यांच्या विधीज्ञांना वेळोवेळी पुकारले असता गैरहजर राहिले.

9. **<u>मुददा क्रमांक 1 ते 3 बाबत</u>** :–

वादीच्या विधीज्ञांनी युक्तीवाद केला की, दावा कलम 1 व 1 अ ही वादींची मिळकत असुन त्यामधुन प्रतिवादी रस्ता करण्याच्या विचारात आहेत. त्याठिकाणी रस्ता अस्तित्वात नाही व कोणत्याही कायदेशीर प्रक्रियेच्या अवलंबाशिवाय रस्ता तयार करण्याचे नियोजित केले आहे. त्यामुळे, वादीच्या मिळकतीचे नुकसान होणार आहे.

10. सर्व कागदपत्रांचे अवलोकन करता असे दिसुन येते की, आवर्डे येथील ग्रामस्थांनी वादी क्रमांक 1 च्या विरूध्द वेळोवेळी तहसिलदार व जिल्हाधिकारी यांचेकडे

रस्ता अडविल्याबाबत तक्रार करून रस्त्याची मागणी केली आहे. तसेच, तहसिलदार पाटण यांनी वेळोवेळी वादी क्रमांक 1 यास नोटीस पाठवुन प्रकरणाच्या सुनावणीसाठी हजर राहण्यास सुचित केले आहे. प्रतिवादींचे कथनानुसार दावा मिळकतीमधुन रस्ता पुर्वीपासुन अस्तित्वात आहे. सदर बाबीस पुष्टी देण्यासाठी कोणताही कागदोपत्री पुरावा प्रतिवादीकडुन दाखल केलेला नाही. सातबारा उतारा व ग्रामपंचायत मिळकतीचे उतारे यांचे अवलोकन करता, दावा मिळकत वादींची असल्याचे दिसुन येते. प्रतिवादीने दावा मिळकत ही रस्त्यासाठी संपादीत केली आहे किंवा दावा मिळकतीमधुन पुर्वापार रस्ता चालत आलेला आहे हे दाखविण्यास पुरावा अभिलेखावर दाखल केला नाही. वादींनी अतिक्रमन केले बाबत कोणताही पुरावा अभिलेखावर नाही.

11. प्रतिवादी व ग्रामस्थांनी वेळोवेळी तहसिलदार व जिल्हा अधिकारी यांच्याकडे दिलेला अर्ज पाहता, प्रतिवादी हे दावा मिळकतीवर रस्ता तयार करण्याच्या तयारीत असल्याचे दिसुन येते. जर वादीच्या संमतीशिवाय व कोणत्याही कायदेशीर प्रक्रियेविना दावा मिळकतीमधुन रस्ता केल्यास वादीचे अतोनात नुकसान होणार आहे. सर्व बाबी पाहता, प्रथमदर्शनी प्रकरण व सोयीचा समतोल वादींच्या हक्कात आहे. सदर अर्ज नामंजुर केल्यास व प्रतिवादींनी रस्ता तयार केल्यास निश्चितच वादींचे कशानेही भरून न येणारे नुकसान होणार आहे. सबब, मुदद्‌ा क्रमांक 1 ते 3 चा निष्कर्ष होकारार्थी नोंदविण्यात येतो व खालीलप्रमाणे आदेश नोंदविण्यात येतो :–

## <u>आदेश</u>

1. सदरचा अर्ज मंजुर करण्यात येतो.
2. प्रतिवादीनी स्वतः अगर इतरांमार्फत कायदेशीर मार्गाचा अवलंब केल्याशिवाय दावा मिळकतीमधुन रस्ता तयार करू नये व वादींच्या कब्जेवहिवाटीस हरकत अडथळा करू नये अशी तुर्तातुर्त मनाई सदर दाव्याचा अंतिम निकाल लागेपर्यंत किंवा त्या अगोदर इतर आदेश पारीत करेपर्यंत देण्यात येते.

पाटण
दिनांक –13/08/2013

(शशिकांत रा. मोकाशी)
सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर पाटण.